महाराष्ट्र शासन
**पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,**
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर-431001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :- cp.aurangabad@mahapolice.gov.in

क्र.कक्ष-१०/पो.शि/भरती-प्रेसनोट/२०२४/10707 छत्रपती संभाजीनगर, दिनांक ०४.०७.२०२४

## प्रेस नोट

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवर २१२ रिक्त पोलीस शिपाई पदांची जाहिरात दि. २९.२.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदरच्या २१२ रिक्त पदांमध्ये ८ पोलीस शिपाई बॅण्डस्मन चे पद अंतर्भुत आहे. सदरच्या पोलीस शिपाई पदाच्या रिक्त पदांकरिता १६१३३ उमेदवारांनी आवेदन अर्ज सादर केलेले होते. आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना दि. १९.६.२०२४ ते २६.६.२०२४ या कालावधीत विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी घेण्याकरिता महाआयटी विभागाने प्रवेशपत्र निर्गमित केलेले होते. शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी करिता प्रत्यक्ष ९८३१ उमेदवार हजर राहिलेले आहेत. त्यापैकी ८४९३ उमेदवारांने मैदानी चाचणी पुर्ण केली आहे. पोलीस शिपाई पदाकरिता ३९८७ उमेदवाराने मैदानी चाचणी मध्ये ५०% (२५ गुण) पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले आहेत.

पोलीस शिपाई बॅण्डस्मन पदाकरिता ६३१ उमेदवाराने मैदानी चाचणी मध्ये ५०% (२५ गुण) पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले आहेत. पोलीस शिपाई बॅण्डसमन यांची दि. ८.७.२०२४ ते १०.७.२०२४ या कालावधीत एकुण ६३१ उमेदवारांची कौशल्य चाचणी देवगिरी कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सकाळी ०९.०० वाजेपासुन घेण्यात येणार आहे. सदरच्या कौशल्य चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधुन रिक्त जागेच्या १:१० या प्रमाणात पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचीच लेखी परिक्षा घेण्यात येणार आहे.

सदर मैदानी चाचणीमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे जाहिरातीमधील रिक्त पदाचे १:१० प्रमाणात लेखी परिक्षेकरिता २२२८ उमेदवार पोलीस शिपाई पदाच्या लेखी परिक्षेकरिता पात्र ठरले आहेत. पोलीस शिपाई लेखी परिक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षणासह गुणांची यादी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच उमेदवारांना महाआयटी विभागाकडुन पोलीस शिपाई पदाच्या लेखी परिक्षेचे स्वतंत्र प्रवेश पत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदरची लेखी परिक्षा हि वस्तुनिष्ठ स्वरुपाची असणार आहे.

संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या उमेदवारांची पोलीस शिपाई पदाची लेखी परिक्षा दि. ७.७.२०२४ रोजी १५.०० वाजता खालील ठिकाणी घेण्यात येणार आहे. उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी दि. ७.७.२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता येणे आवश्यक राहील.

**राम नवले यांचे गुरुमाऊली वेअर हाऊस,**
**गट नं. १२९, करोडी टोकलनाका, ओम-साई हॉटेलचे मागे,**
**सोलापुर-धुळे राष्ट्रीय महामार्ग-२११, छत्रपती संभाजीनगर.**

उमेदवारांना लेखी परिक्षेकरिता या कार्यालयाकडुन परिक्षा पॅड व ब्लॅक बॉल पेन पुरविण्यात येणार आहे. उमेदवारांनी लेखी परिक्षेकरिता येतांना सोबत प्रवेशपत्र व आवेदन अर्ज घेवुन यावे. इतर कोणतेही किंमती वस्तु कॅल्क्युलेटर , स्मार्टवॉच, मोबाईल फोन, हेडफोन,ब्ल्युटुथ-हेडफोन व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु सोबत बाळगु नये.

**( शिलवंत नांदेडकर )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर.